महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०३ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये




## लक्षवेधी

## ठाकरे गटाचे चार नगरसेवक निवडणूक निकालानंतर घरी परतले

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण–डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे चार नगरसेवक अचानक बेपत्ता झाले होते. यामध्ये मधुर म्हात्रे, किर्ती ढोणे, राहुल कोट आणि स्वप्नाली केणे यांचा समावेश होता. पक्षाच्या बैठकीला हजर राहण्याचे आदेश असूनही हे नगरसेवक गैरहजर होते, तसेच गटनोंदणीसाठी देखील उपस्थित राहिले नव्हते. यामुळे ठाकरे गटाने त्यांच्या विरोधात सदस्यत्व रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली होती.

पक्षाकडून कारवाईचे संकेत मिळाल्यानंतर आणि काही दिवसांच्या अनिश्चिततेनंतर रविवारी हे चारही नगरसेवक आपआपल्या घरी परतले आहेत. मधुर म्हात्रे जवळपास १६ दिवसानंतर कल्याण पूर्वेतील घरी परतला असून कार्यकर्त्यांनी त्याचे जल्लोष स्वागत केले. सदर नगरसेवकांनी याबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र आज महापौर–उपमहापौर निवडणुकीसाठी ते उपस्थित राहणार असल्याचे समजते. या घटनाक्रमामुळे महापालिका निवडणुकीनंतर राजकीय वातावरण तापले आहे आणि पक्षातील अनुशासन व सहभागावर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## कचरा नियम मोडल्यास मुंबईत थेट दंडात्मक कारवाई

सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास ₹ २५० दंड
कचरा टाकल्यास ₹ ५०० दंड
ओला-सुका कचरा वर्गीकरण न केल्यास ₹२०० दंड
विनापरवाना राडारोडा वाहतूक केल्यास थेट ₹२५,००० दंड



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई:** मुंबई महानगरपालिकेकडून घनकचरा आणि स्वच्छता विषयक जागृता निर्माण केली जात आहे. यामध्ये कचरा निर्माण करणारे घटक, विविध आस्थापना, कचराविषयक सेवा प्रदाता, घनकचरा व्यवस्थापन, साठवणूक, वितरण व प्रक्रिया, या बाबत नियमावलींचा समावेश आहे. नागरिक किंवा आस्थापनांनी यासंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या अंतर्गत, सार्वजनिक स्थळी थुंकल्यास 250, कचरा टाकल्यास 500, ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण न केल्यास 200 रूपये, विनापरवाना राडारोडा वाहतूक केल्यास थेट 25 हजार रुपये दंड आकारण्यात येईल. महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांच्या देखरेखीखाली कार्यक्षेत्रातील परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नियमितपणे कार्यवाही केली जाते. यासह वेळोवेळी विशेष स्वच्छता मोहीम आणि उपक्रमांचे आयोजन केले जाते. याच पार्श्वभूमीवर, हा उपविधी (Bylaws) जारी करण्यात येत आहे. मुंबईत घनकचऱ्याचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून अविरतपणे प्रयत्न केले जात आहेत असं अश्विनी जोशी यांनी सांगितले.

# मलंगगडावरील बांधकामप्रकरणी लवकरच निर्णय

## – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ:** मलंगगडावरील काही बांधकामांबाबत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा निकाल लवकरच लागेल. तो निकाल मलंगभक्तांच्या अपेक्षेनुसार असेल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. माघी पौर्णिमेनिमित्त मलंगगडावर आयोजित भव्य यात्रेदरम्यान त्यांनी श्री मच्छिंद्रनाथ बाबांच्या समाधीस्थळी दर्शन घेत पूजा केली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधत याबाबत भाष्य केले. गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबीत असून दोन धर्मियांकडून येथे दावा केला जातो आहे.



माघी पौर्णिमेच्या निमित्ताने मलंगगड परिसर भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात न्हाऊन निघाला असून राज्यासह परराज्यातूनही हजारो भाविक नाथांच्या दर्शनासाठी दाखल झाले आहेत. दोन दिवसांपूर्वी येथे भक्तीभावाने पालखीचे आयोजन करण्यात आले होते. या पालखीची विधीवत पुजा करून तीची मिरवणूक काढली जाते. याचा मान विशिष्ट कुटुंबाकडे गेल्या अनके वर्षांपासून आहे. माघी पौर्णिमेच्या दिवशी येथे यात्रेला सुरूवात होते. तर पुढील काही दिवस येथे जत्रा असते.

सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मलंगगडावर भेट दिली. बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि धर्मवीर आनंद दिघेसाहेबांच्या संकल्पनेतून सुरू झालेली ही मंगल यात्रा अनेक वर्षांपासून अखंडपणे सुरू असून पुढील काळातही याच भक्तिभावाने ती सुरू राहील, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले. यंदाच्या यात्रेला विशेष स्वरूप प्राप्त झाले असून भाविकांच्या सोयीसाठी फ्युनिक्युलर (रोपवे) सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे वयोवृद्ध, महिला तसेच चालण्यास अडचण असलेल्या भाविकांनाही सहजपणे मलंगनाथांचे दर्शन घेता येत आहे. पूर्वी अनेक भाविक दर्शनापासून वंचित राहत होते. मात्र या सुविधेमुळे त्यांना मोठा दिलासा मिळत असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. आनंद दिघेनी सुरू केलेल्या सेवाभावी उपक्रमांची परंपरा आजही कार्यकर्ते व संस्था जपत असून यात्रेचा अनुभव अधिक सुरक्षित व सुखकर करण्यावर भर दिला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मलंगगड परिसरातील मालमत्तांबाबत न्यायालयात सुनावणी सुरू असून लवकरच यावर निर्णय अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार राजेश मोरे, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, ठाणे विधानसभा प्रमुख हेमंत पवार, शिवसेना उत्तर महाराष्ट्र सचिव भाऊसाहेब चौधरी, कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख महेश गायकवाड, नगरसेविका नम्रता भोसले-जाधव यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### फ्युनिकुलरचा भाविकांना लाभ

गेल्या महिन्यात मलंगगडावर जाण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून प्रस्तावित असलेली फ्युनिकुलर ट्रेन सेवा सुरू झाली. त्यामुळे तीन तासांचा प्रवास अवघ्या दहा मिनीटात होतो आहे. त्यामुळे भाविकांनी मलंगगडावर भेट देण्याचे प्रमाण वाढवले आहे. यात्रेनिमित्त ज्येष्ठ नागरिक, लहान भाविकांना याचा मोठा फायदा होतो आहे.

## स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने झंझावाती नेतृत्व गमावले – आ. किसन कथोरे





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २**

**बदलापूर :** महाराष्ट्राच्या राजकारणातील झंझावाती नेतृत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांच्या अचानक व अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही अत्यंत मोठी हानी असल्याची भावना आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केली आहे.स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बदलापूर येथील अजय राजा हॉलमध्ये सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या शोकसभेला उपस्थित राहून आमदार किसन कथोरे यांनी स्व. अजितदादा पवार यांना मनःपूर्वक श्रद्धांजली अर्पण केली.

आमदार किसन कथोरे यांनी सांगितले की, अजितदादा पवार हे नेहमीच जनतेच्या हितासाठी कार्यरत राहणारे प्रेरणादायी नेतृत्व होते. त्यांच्या कार्यपद्धतीने आणि नेतृत्वगुणांनी अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली. त्यांच्या निधनाने केवळ राजकारणातीलच नव्हे, तर प्रत्येक सामान्य नागरिकाच्या हृदयातील एक महत्त्वाची व्यक्ती आपल्यातून निघून गेल्याची भावना निर्माण झाली आहे.त्यांची विचारसरणी, निष्ठा आणि सक्षम नेतृत्वाची आठवण सदैव स्मरणात राहील, असे सांगत आमदार किसन कथोरे यांनी स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### गोवेलीच्या जीवनदीप महाविद्यालयात

## आदिवासी बांधवांसाठी ‘संविधानाचा जागर’

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली :** भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन ७९ वर्षे पूर्ण झाली असून संविधान निर्मितीला ७७ वर्षे झाली आहेत. तरीदेखील भारतासारख्या विकसनशील देशात आजही पायाभूत सोयी-सुविधांचा तुटवडा जाणवतो. शिक्षण तसेच नागरिकांच्या हक्कांबाबतची माहिती आजही अनेकांपर्यंत पोहोचलेली नाही. यामध्ये विशेषतः आदिवासी बांधवांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. शासकीय योजना व आपल्या मूलभूत हक्कांपासून आदिवासी बांधव अनेकदा वंचित राहतात.

या पार्श्वभूमीवर आदिवासी बांधवांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी जीवनदीप महाविद्यालय, गोवेली येथे श्रमजीवी संघटना, महाराष्ट्र शासन व ग्रुप ग्रामपंचायत रेवती गोवेली यांच्या संयुक्त सहकार्याने ‘संविधानाचा जागर’ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




या कार्यक्रमाला श्री. विवेक (भाऊ) पंडित (माजी विधानसभा सदस्य, संस्थापक श्रमजीवी संघटना, अध्यक्ष आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य – मंत्री दर्जा), जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे, श्री. पंकज गिरी (पोलीस उपनिरीक्षक, मांडा–टिटवाळा), श्री. विकास गारुडकर (तहसीलदार, कल्याण), श्री. रघुनाथ गवारी (गटविकास अधिकारी, पंचायत समिती कल्याण), श्री. प्रशांत गजाकोश (विस्तार अधिकारी), डॉ. आशा गुंजाळ (तालुका वैद्यकीय अधिकारी), श्री. पराग भोसले (विस्तार अधिकारी, गोवेली), श्री. जयेश थोरात (ग्रामपंचायत अधिकारी) तसेच श्री. काळुराम घुडे (माजी उपसरपंच) हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात गणरायाच्या चरणी नतमस्तक होत दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी श्रमजीवी संघटनेचे प्रतीकचिन्ह, छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना श्री. विवेक (भाऊ) पंडित यांनी आदिवासी बांधवांना संविधानातील हक्क, शासकीय योजना तसेच ग्रामीण पातळीवरील प्रशासन याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी आदिवासी बांधवांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या निराकरणाबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, संचालक प्रशांत घोडविंदे, श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी तसेच कल्याण तालुक्यातील विविध खेडोपाड्यांतून आलेले मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे यांनी केले. सर्वांच्या सहकार्याने ‘संविधानाचा जागर’ हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# कॅबिनेट बैठक रद्द | सुनेत्रा पवारांच्या मंत्रालयात येण्याची तारीख निश्चित

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २**

**मुंबई :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने राष्ट्रवादीसह राज्याच्या राजकारणातही मोठा बदल झाल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांतही या दुर्घटनेचा आणि अजित पवारांच्या नसण्याचा परिणाम होईल, अशी चर्चा स्थानिक स्तरावर होत आहे. दुसरीकडे पवार कुटुंबीय देखील दुःखातून सावरत राजकीय पाऊले टाकत आहेत. उपमुख्यमंत्रीपदाची




शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा यांनी आज साताऱ्याच्या कराडमधील प्रीतीसंगम येथे जाऊन यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच, अजित पवारांसमवेत विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या सुरक्षा रक्षक विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यामुळे, आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मंत्रालयात कधी जाणार याची माहिती समोर आली आहे.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गेल्या काही दिवसांपूर्वी दुर्दैवी अपघाती निधन झाले, अजित पवार यांच्यावर शोकाकुल वातावरणात बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आल्यानंतर त्यांचे अस्थिकलश संपूर्ण राज्यभरात कार्यकर्त्यांच्या दर्शनासाठी पाठवण्यात आले आहेत. त्यानुसार, आज राज्यातील विविध जिल्ह्यात अजित पवारांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी, अनेक ठिकाणी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. दुसरीकडे बारामतीतही आज पवार कुटुंबीयांच्या सांत्वनसाठी राज्यभरातून कार्यकर्ते पदाधिकारी येत आहेत. त्यासाठी, सुनेत्रा पवार याही बारामतीत आहेत. उद्या मंत्रालयात होणारी मंत्रिमंडळ बैठक पुढे ढकलण्यात आली आहे, त्यामुळे या आठवड्यात मंत्रिमंडळ बैठक होणार नाही.

### सुनेत्रा पवार 9 फेब्रुवारीला मंत्रालयात

**राज्य मंत्रिमंडळाची बैठक दर मंगळवारी होत असते, मात्र उद्याची बैठक होणार नसल्याची माहिती आहे. अजित पवारांचे दुःखद निधन आणि राज्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्याची मंत्रिमंडळ बैठक होणार नाही. त्यामुळे, या बैठकीला नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित राहतील काय, या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. सुनेत्रा पवार पुढील दोन दिवस पुणे जिल्ह्यात दौरा करणार आहेत. तर, 9 फेब्रुवारी रोजी मंत्रालयात उपस्थित होणार आहेत, अशी माहितीही सूत्रांकडून मिळाली. दरम्यान, आज बारामतीत पवार कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी अजित दादा प्रेमी, नागरिक आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे.**

# न्यायालयाच्या आदेशानंतर बदलापुरात अतिक्रमणांवर कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २**

**बदलापूर :** उच्च न्यायालयात एका रीट याचिकेतील सुनावणीदरम्यान कुळगाव बदलापूर नगर परिषद क्षेत्रातील अनधिकृत बांधकांमांवर न्यायालयाने परखड मत व्यक्त केले होते. त्यानंतर सोमवारी कुळगाव बदलापूर नगर परिषद प्रशासनाने शहरातील अनधिकृत बांधकांमांवर धडक कारवाई केली. सायंकाळपर्यंत ४० हून अधिक बांधकामे जमिनदोस्त करण्यात आली होती. तर याकामी जवळपास पूर्ण पालिका पालिका प्रशासन रस्त्यावर उतरलेले दिसले. कारवाई झालेल्या अनधिकृत बांधकांमांमध्ये नामांकीत हॉटेल, धाबे,



उपहारगृह, वाहन विक्रीची दुकाने यांचा समावेश आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून नामांकीत कंपन्यांचा कारभारही अनधिकृत वास्तूंमधूनच सुरू असल्याचे समोर आले आहे.

कुळगाव बदलापूर नगर परिषद क्षेत्रातील एका खटल्याच्या सुनावणी दरम्यान बदलापूर शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न चर्चेला आला. त्यावरून नगर परिषद प्रशासनाला न्यायालयाने फटकारले.शहरात तब्बल ४३८ अनधिकृत बांधकामे असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली होती. या बांधकामांची यादी जाहीर करण्याचे आदेश उच्च न्यायलयाने दिले होते. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानंतर ही यादी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी परिषदेने वृत्तपत्रांच्या माध्यमातून जाहीर केली.

**न्यायालयाच्या आदेशानुसार सदर कारवाई सुरू करण्यात आली आहे. दोन पथकांमध्ये १०० हून अधिक कर्मचारी, पोलीस, सुरक्षा मंडळाचे कर्मचारी आणि यंत्रांच्या सहाय्याने ही कारवाई करण्यात आली. यापुढेही सर्व अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जाणार आहे. शहरातील ४३८ बांधकामे हटवली जातील.**
**- मारूती गायकवाड, मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगर परिषद.**

प्रशासनाच्या वतीने ही अनधिकृत बांधकामे बांधकाम करणाऱ्याने हटवावे असे आवाहन करण्यात आले होते. मात्र दोन महिन्यांनंतरही ही बांधकामे हटली नाहीत.त्यामुळे सोमवारी कुळगाव बदलापूर नगर परिषद प्रशासनाने अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई सुरू केली. सोमवारी सकाळच्या सुमारास बदलापूर पूर्वेतील कर्जत रस्ता आणि प्रस्तावित पनवेल मार्गावर पालिकेचे कर्मचारी, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षारक्षक आणि जेसीबी यंत्रणा फिरताना दिसत होती. त्यानंतर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. आज कारवाई होणारच याची चाहूल लागताच सर्व दुकानदार, हॉटेलधारक, कंपन्यांचे लोक बांधकामातील साहित्य, माल काढू लागले. त्या कर्मचाऱ्यांची एकच तारांबळ उडाली.

कार्मेल शाळेसमोरच्या परिसरातून या कारवाईला सुरूवात करण्यात आली. एक पथक कर्जत राज्यमार्गावर तर दुसरे पथक प्रस्तावित पनवेल मार्गावर कारवाई करत होते. या कारवाईत अनेक हॉटेल, उपहारगृह, धाबे, कार, दुचाकीची दुकाने, टपऱ्या जमिनदोस्त करण्यात आली. यावेळी अनेकांनी कारवाईला विरोध करण्याचा प्रयत्न केला. काहींनी नोटीस नसल्याचे कारण देत कारवाई करता येणार नाही अशी सबब मांडली. मात्र प्रशासनाने नोव्हेंबर महिन्यातील नोटीशीचा दाखल देत कारवाई सुरूच ठेवली. सायंकाळपर्यंत ४० हून अधिक बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे.





## वाचक मनोगत

### केंद्रीय अर्थसंकल्प
### अपेक्षा, दिशा आणि वास्तव




काल सादर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प हा देशाच्या आर्थिक वाटचालीला दिशा देणारा ठरतो. महागाई, बेरोजगारी, ग्रामीण संकट, शेतकरी प्रश्न आणि मध्यमवर्गीयांचे वाढते खर्च या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प सादर झाला. सरकारने विकास, पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था आणि गुंतवणूक यांवर भर दिला असून "विकसित भारत" या संकल्पनेला पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे.

या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, बंदरे आणि शहरी विकासासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली आहे. यामुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. डिजिटलायझेशन, स्टार्टअप्स आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यावरही भर देण्यात आला आहे, जे तरुणांसाठी सकारात्मक पाऊल मानले जाऊ शकते. मात्र दुसरीकडे पाहता, महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांसाठी थेट दिलासा देणाऱ्या उपाययोजना तुलनेने कमी असल्याची भावना निर्माण होते. मध्यमवर्गीय करदात्यांना मोठी करसवलत अपेक्षित होती, ती मर्यादित स्वरूपातच मिळाली. शेतकरी वर्गासाठी योजनांची घोषणा करण्यात आली असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि शेतमालाला हमीभाव मिळण्याबाबत स्पष्टता अपेक्षित आहे. आरोग्य व शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याची गरज असताना, या क्षेत्रांसाठी अधिक ठोस तरतुदी अपेक्षित होत्या. सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने दुर्बल घटकांसाठी अधिक व्यापक योजना आवश्यक वाटतात. एकूणच, हा अर्थसंकल्प दीर्घकालीन विकासाची दिशा दाखवणारा असला, तरी तात्काळ दिलासा देणाऱ्या निर्णयांची उणीव जाणवते. आता या घोषणांची प्रभावी अंमलबजावणी होते का, यावरच या अर्थसंकल्पाचे खरे यश अवलंबून असेल. या अर्थसंकल्पात महिला सक्षमीकरण, युवक कौशल्यविकास आणि स्वयंरोजगाराच्या संधी यांचा उल्लेख करण्यात आला असला, तरी या योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत कसा पोहोचेल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी सिंचन, पाणीपुरवठा, ग्रामीण रस्ते व कृषी संलग्न उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करताना केवळ घोषणांपेक्षा बाजारपेठ, साठवणूक व्यवस्था आणि प्रक्रिया उद्योग यांवर अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कृषी क्षेत्राला उद्योगाशी जोडल्याशिवाय शेतकऱ्यांच्या जीवनात मूलभूत बदल घडणार नाही. शहरी भागात वाढती लोकसंख्या, घरांची समस्या, वाहतूक कोंडी आणि प्रदूषण यावर दीर्घकालीन उपाययोजना अपेक्षित होत्या. हरित ऊर्जा, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. अनेकदा चांगल्या योजना कागदावरच राहतात आणि प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी अपुरी ठरते. त्यामुळे या अर्थसंकल्पातील तरतुदींचे योग्य नियोजन, पारदर्शक अंमलबजावणी आणि परिणामकारक देखरेख अत्यंत आवश्यक ठरणार आहे.

**सचिन आवारे**
गांधारी, कल्याण

# वायू-ध्वनी प्रदूषण नियमभंग करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांवर पनवेल मनपाची कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २**




**पनवेल :** मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पनवेल महानगरपालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून वायू व ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३४ बांधकाम प्रकल्पांच्या कामांना स्थगिती देण्यात आली आहे. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती महापालिकेच्या जनसंपर्क विभागाने दिली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत व्यापक तपासणी करण्यात आली. स्थळपाहणी अहवालानुसार ३४ बांधकामस्थळांवर गंभीर त्रुटी आढळून आल्याने संबंधित प्रकल्पांचे काम तात्काळ थांबविण्यात आल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. मागील महिन्यात महापालिकेच्या प्रभागस्तरीय पर्यावरण समिती व नगररचना विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील एकूण १६९ बांधकाम प्रकल्प व स्थळांना उपाययोजना करण्याबाबत किंवा काम बंद ठेवण्यासंदर्भात इशारावजा जाहीर नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र नोटिसा मिळूनही काही बांधकाम व्यावसायिकांनी अपेक्षित कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर महापालिकेच्या विशेष पथकाने पुन्हा प्रत्यक्ष स्थळपाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी केली. या तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना न करणे, बांधकाम साहित्य खुले ठेवणे, प्रदूषण करणाऱ्या साहित्यावर नियमाप्रमाणे पाणी न शिंपडणे, वाहनांची स्वच्छता न करणे तसेच ब्लास्टिंग करताना मानक कार्यपद्धतीचे पालन न करणे, अशा गंभीर बाबी आढळून आल्या. त्यानुसार संबंधित ३४ प्रकल्पांवर कठोर कारवाई करण्यात आली.

# कांबा ग्रामपंचायतीच्या नूतन सुसज्ज कार्यालयाचे लोकार्पण



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**संजय कांबळे / दि. २**

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील औद्योगिक ग्रामपंचायत म्हणून नावलौकिक मिळवलेल्या कांबा ग्रामपंचायतीच्या नूतन सुसज्ज कार्यालयाचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा नुकताच सरपंच उषा भास्कर गांवडे, उपसरपंच दत्ता आलोराम भोईर तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. तब्बल ४८ वर्षांनंतर ग्रामपंचायतीला स्वतंत्र व सुसज्ज कार्यालय मिळाल्याने फटाक्यांच्या आतषबाजीत ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.

कल्याण-मुरबाड महामार्गालगत व उल्हास नदीच्या काठावर वसलेल्या कांबा गावामध्ये कांबा, पावशेपाडा, वाघेरापाडा, पठारपाडा, नानेपाडा, पाचवामैल आदी लहान-मोठ्या वाड्या-पाड्यांचा समावेश आहे. गावातील जुन्या ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन १९७८ साली तत्कालीन सरपंच काथोड पांडुरंग शिरोसे व उपसरपंच बाबू कृष्णा पावशे यांच्या हस्ते करण्यात आले होते.

मात्र कार्यालयाची जागा अत्यंत अपुरी असल्याने कपाटे, कागदपत्रे व ग्रामस्थांची सततची वर्दळ यामुळे कामकाज करणे कठीण झाले होते. गेल्या ४८ वर्षांपासून ग्रामपंचायतीचा हा वनवास सुरू होता. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार कुमार आयलानी यांच्या आमदार निधी व जनसुविधा निधीतून याच जागी नूतन सुसज्ज कार्यालय उभारण्यात आले.

सद्याच्या सरपंच, उपसरपंच व सदस्यांचा कार्यकाळ अवघ्या काही दिवसांत संपणार असल्याने त्यांच्या कार्यकाळातच या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी सुंदना पाटील, पत्रकार संजय कांबळे यांच्यासह सरपंच उषा गांवडे, उपसरपंच दत्ता भोईर व सर्व सदस्य उपस्थित होते.

यावेळी माजी सरपंच व सदस्य संदीप पावशे, हरिदास सावर, भारती भगत, सदस्य अरुण शिरोसे, संतोष पावशे, छायाताई बनकरी, इशा भोईर, वंदना पावशे, सोनाली उबाळे, सुंगधा पावशे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा व पत्रकार संजय कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. या नूतन कार्यालयामुळे ग्रामस्थांचे गेल्या अनेक वर्षांचे स्वप्न साकार झाल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# संजय बोरगे यांना बुद्धिस्ट कल्चरल ट्रस्टचा 'माता भीमाई स्मृती पुरस्कार'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड -दिलिप पवार**



मुरबाड तालुक्यात गेल्या तब्बल २५ वर्षांपासून सातत्याने, निर्भीड व समाजाभिमुख पत्रकारिता करणारे मुरबाड समाचार व आवाज महाराष्ट्र या वृत्तमाध्यमांचे संपादक संजय बोरगे यांना यंदाचा प्रतिष्ठेचा 'माता भीमाई स्मृती पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री माता भीमाई यांचे माहेर असलेल्या मुरबाड तालुक्यातील आंबेटेंभे येथे माता भीमाईंच्या १७२ व्या जयंतीनिमित्त दि बुद्धिस्ट कल्चरल ट्रस्टच्या वतीने भव्य व प्रेरणादायी जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या, वंचित-उपेक्षित घटकांचा आवाज बुलंद करणाऱ्या संजय बोरगे यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या गौरव सोहळ्यात आमदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, दि बुद्धिस्ट कल्चरल ट्रस्टच्या अध्यक्षा प्रियाताई खरे, स्वागताध्यक्ष प्रमोदजी जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती (महाराष्ट्र शासन) चे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, मुरबाडचे नायब तहसीलदार अमोल शिंदे, आंबेटेंभे गावच्या सरपंच रेश्माताई बाळाशेठ घरत, RPI चे तालुकाध्यक्ष दिनेश उघडे तसेच सम्राटचे संपादक कुणाल कांबळे यांच्या शुभहस्ते संजय बोरगे यांना शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी सांगितले की, संजय बोरगे यांनी आपल्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत ग्रामीण भागातील प्रश्न, सामाजिक अन्याय, शोषित-वंचितांचे मुद्दे, तसेच संविधानिक मूल्यांची जाणीव समाजात निर्माण करण्यासाठी सातत्याने लेखणी वापरली आहे. कोणत्याही दबावाला न झुकता सत्य मांडण्याची भूमिका ही आजच्या पत्रकारितेसाठी प्रेरणादायी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

पुरस्कार स्वीकारताना संजय बोरगे यांनी हा सन्मान माता भीमाई यांच्या संघर्षशील जीवनाला व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. "पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. पुढील काळातही सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि संविधानाच्या मूल्यांसाठी लेखणी अविरत सुरू ठेवणार," असा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

या जयंती महोत्सवात विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, आंबेटेंभे व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार बोरगे यांना मिळालेल्या या मानाच्या पुरस्काराबाबत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर करडे, मुरबाड तालुका अध्यक्ष दिलीप पवार, इलेक्ट्रॉनिक मिडिया अध्यक्ष चेतन पोतदार यांनी विशेष अभिनंदन केले आहे

# आनंदवाडी येथे संत शिरोमणी रविदास महाराज मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पूर्व आनंदवाडी येते संत शिरोमणी रविदास महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ च्या वतीने श्री संत शिरोमणी रविदास महाराज ६४९ वी जयंती मोठ्या जल्लोषात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या निमित्ताने रविवारी संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या समाजमंदिराचा लोकार्पण सोहळा कल्याण पूर्वेच्या आमदार सुलभा गायकवाड यांच्याहस्ते मोठ्या भक्तिभावात पार पडला.

या जयंती उत्सव समिती संस्थापक अध्यक्ष राम बनसोडे, उत्सव समिती अध्यक्ष राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी आमदार जगन्नाथ शिंदे यांच्या हस्ते संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भव्य मिरवणुकीची सुरवात करण्यात आली. संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक केडीएमसी दवाखाना, गणपती मंदिर, कोळसेवाडी, उतेकर बिल्डिंग, दुर्गामाता मंदिर, डबल टॉवर मार्गे आनंदवाडी येथील नव्या समाजमंदिरापर्यंत नेण्यात आली असून मिरवणुकीत समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मंत्रोच्चार व विधीपूर्वक संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व पूजन करण्यात आले.

यावेळीसुरेश पवार, सोनी क्षिरसागर, संदीप क्षीरसागर, भैरवनाथ वाघमारे, प्रकाश लांडगे, सोमनाथ राऊत, कविता रुपवते, मंगल गायकवाड, ललीता साबळे, वंदना नायडु, रेखा चंद्रे, रेश्मा शिरकर, रेखा साळे, अस्मिता गायकवाड, मंगल बनसोडे, कलावती शेवाळे, विठाबाई धनशेट्टी आदी कार्यकर्त उपस्थित होते.

# कोशिंबी केंद्राची शिक्षण परिषद संपन्न !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**● नरेंद्र पाटील**



**शहापूर ग्रामीण**- वासिंद जवळील कोशिंबी केंद्राची आठवी शिक्षण परिषद स्व. यशवंत शिवराम पाटील सभागृह जिल्हा परिषद शाळा, भोकरी येथे पार पडली. यामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सुमधुर आवाजात ईशस्तवन व स्वागत गीत गायन केले. सदर, शिक्षण परिषदेतील नियोजित विषयांवर शिक्षकांनी अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले. शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत राज्यस्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल शिक्षक रवींद्र पोटे यांचा सत्कार करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पाटील व त्यांच्या पत्नी सरपंच प्रगती पाटील यांनी चार लाख रुपये खर्च करून अतिशय सुसज्ज व आकर्षक सभागृह जिल्हा परिषद शाळेला तयार करून दिले आहे. यासाठी मुख्याध्यापक शामराव पवार यांनी परिश्रम घेतले होते. तसेच शाळेला उद्योजक जयदास पालवी यांनी 21 खुर्च्या, अजित ओरा यांनी संगणक सीसी कॅमेरे भेट दिली. दरम्यान कोशिंबी केंद्रातील शिक्षक अतिशय चांगल्या प्रकारे शैक्षणिक कार्य करत असून येथील कुठलीही तक्रार प्राप्त होत नाही त्यामुळे नेहमी सकारात्मक भूमिका ठेवून असेच शैक्षणिक कार्य करत राहिले पाहिजे असे गट शिक्षणाधिकारी संजय असवले यांनी म्हटले तर सदर सभागृह माझे वडील स्व. यशवंत शिवराम पाटील यांच्या स्मरणार्थ शाळेसाठी तयार करून दिले आहे त्याचा निश्चितच या शैक्षणिक कार्यासाठी उपयोग होईल असा विश्वास प्रमोद पाटील यांनी व्यक्त केला.

या शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख शामराव पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून पं. स. भिवंडी गटशिक्षणाधिकारी संजय असवले होते यावेळी सरपंच प्रगती पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पाटील, कास्ट्राईब शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य अशोक गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दीपक सोष्टे, माजी अध्यक्ष विनोद गोरले, सदस्य नम्रता गोरले, शिक्षण प्रेमी ओंकार गोरले, ग्रामस्थ प्रभाकर पडवळ, उद्योजक प्रमोद गोरले, उद्योजक उद्योजक जयदास पालवी , शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका नेत्रा किल्लेदार तर आभार प्रदर्शन अशोक गायकवाड यांनी केले. या शिक्षण परिषदेसाठी भोकरी शाळेतील शिक्षक सतिश सूर्यवंशी, शिक्षिका स्नेहल सावंत, नेत्रा किल्लेदार यांनी परिश्रम घेतले होते.

# भिवंडी महापालिकेचे कर थकबाकीदार शैक्षणिक संस्थेचे कार्यालय आणि कर्मचारी कक्ष सील

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (प्रतिनिधी ) :**

भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्तांनी मालमत्ता कर भरण्यासाठी अभय योजना गतवर्षी राबवून लोकांनी मालमत्ता कर भरावा असे आवाहन केले होते असे असतानाही अनेक जण मालमत्ता कर भरण्यासाठी उत्सुक नसल्याने आयुक्तांचे आदेशानुसार पालिका प्रशासनाने आता मालमत्ता कर न भरणाऱ्या विरोधात कारवाई करण्याचे पाऊल उचलले असुन शहरातील निजामपूरा भागात मालमत्ता कर थकबाकीदार असलेल्या शैक्षणिक संस्थेविरुद्ध महापालिकेने अखेर कठोर भूमिका घेत शालेय संस्थेवर कारवाई करीत शाळेचे कार्यालय, कर्मचारी कक्ष आणि इतर कार्यालये सील केली आहेत. या घटनेने शहरातील शैक्षणिक संस्थांमध्ये खळबळ माजली आहे.

भिवंडी शहरातील निजामपूर भागात राम भवन हॉटेल समोर हुदा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज असून या शाळेच्या मालमत्ता धारकाने गेल्या पाच वर्षांपासून महापालिकेचे विविध कर भरलेले नाही,अशी माहिती समोर आली आहे. या शाळेची मालमत्ता संस्थेच्या राबिया फैसल मेमन यांच्या नावावर असून त्यांच्या नांवे महानगरपालिकेची १६.३४ लाख रुपयांची मालमत्ता कर थकबाकी होती.महानगरपालिकेकडून वारंवार सूचना आणि इशारे देऊनही, शाळा प्रशासनाने घर कर भरला नाही त्यामुळे पालिकेच्या सहाय्यक आयुक्त सय्यद चिवणे कठोर कारवाई करीत शाळेचे कार्यालय, कर्मचारी कक्ष आणि इतर कार्यालये सील केले आहे.

तसेच, भिवंडी विव्हर्स एज्युकेशन सोसायटी द्वारे चालवल्या जाणाऱ्या समद नगर येथील अब्दुल शकूर प्राथमिक शाळेची देखील २५ लाख ०४ हजार ५१६ रुपयांची मालमत्ता कर थकबाकी असल्याचे आढळून आले. त्यामुळे महानगरपालिकेच्या वसुली विभागाने कारवाई करीत शाळेचा संगणक कक्ष आणि कार्यालय सील केले आहे. दरम्यान हुदा शाळेला सात दिवसांचा वाढीव कालावधी देण्यात आला असून जर थकबाकीची रक्कम निर्धारित वेळेत भरली नाही तर त्याचे पाणी आणि वीज कनेक्शन तोडले जातील,असा इशारा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे.नागरिकांनी शहराच्या विकासाच्या व सुविधांच्या निमित्ताने नियमित कर भरणे आवश्यक आहे, असे प्रभाग समिती ५ चे अधिकारी सय्यद चिवणे यांनी आवाहन केले आहे.

## भविष्यवेध



■ मंगळवार
03 फेब्रुवारी 2026

**मेष**
निर्णय घेताना भावनांवर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रशंसा मिळेल. आत्मविश्वास वाढेल. महत्त्वाची कामे पूर्ण होतील. खर्च वाढण्याची शक्यता. वाद टाळल्यास दिवस चांगला जाईल.

**वृषभ**
आज कामात गती येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी आवश्यक. संयम ठेवल्यास यश मिळेल.

**मिथुन**
कामात अडथळे येऊ शकतात. संयम आणि मेहनतीने परिस्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्या. भागीदारीत लाभ संभवतो. सामाजिक सन्मान मिळेल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक

**कर्क**
घ्या. स्थैर्य लाभेल. गुंतवणुकीसाठी दिवस अनुकूल नाही. संयम ठेवल्यास नातेसंबंध सुधारतील. कामानिमित्त प्रवास संभवतो. बोलण्यातून गैरसमज टाळा. मित्रांचे सहकार्य लाभदायक ठरेल.

**सिंह**
घरगुती प्रश्नांवर लक्ष द्यावे लागेल. खर्च वाढू शकतो. मानसिक शांतता राखणे आवश्यक. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. अडकलेली कामे पूर्ण होतील. अहंकार टाळल्यास लाभ होईल.

**कन्या**
कार्यक्षेत्रात बदल संभवतो. आरोग्याची काळजी घ्या. मेहनतीचे योग्य फळ मिळेल. भागीदारीत सावधगिरी ठेवा. कायदेशीर बाबींमध्ये यश मिळू शकते. कौटुंबिक आनंद वाढेल. कामाचा

**तुळ**
ताण वाढेल. जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतील. संयम ठेवल्यास यश मिळेल. सर्जनशील कामात यश मिळेल. मित्रांचे सहकार्य लाभेल.
खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे. जुनी

**वृश्चिक**
रखडलेली कामे मार्गी लागतील. नवे संपर्क लाभदायक ठरतील. प्रवासाचे योग आहेत. आरोग्याकडे लक्ष द्या. बोलण्यात संयम ठेवा. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.

**धनु**
कामाचा ताण जाणवेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक स्थैर्य हळूहळू वाढेल. नवीन कल्पनांना यश मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. खर्चाचे नियोजन करा. भावनिक स्थैर्य आवश्यक.

**मकर**
कौटुंबिक आनंद मिळेल. मन अस्वस्थ राहू शकते. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. नातेवाईकांकडून सहकार्य मिळेल. नवीन संधी मिळण्याची शक्यता. प्रवास यशस्वी ठरेल. आहे.

**कुंभ**
भावनिक निर्णय टाळा. आर्थिक स्थिती सुधारेल. कौटुंबिक सौख्य मिळेल. नवीन जबाबदाऱ्या मिळतील. कामात यश मिळेल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल.

**मिन**
गुप्त शत्रूंपासून सावध रहा. आर्थिक निर्णय पुढे ढकला. संयम फायदेशीर ठरेल. शिक्षण व करिअरमध्ये प्रगती होईल. नवीन ओळखी उपयोगी पडतील. दिवस उत्साहवर्धक आहे.



# शिक्षक पात्रता परीक्षेतील गुणांची अट शिथिल करावी – आमदार संजय केळकर

## सेवाजेष्ठ शिक्षकांच्या पदोन्नतीच्या गंभीर प्रश्नावर शिक्षणमंत्र्यांकडे निवेदन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** प्रतिनिधी इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गात अध्यापन करणाऱ्या शासकीय व निमशासकीय शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, केंद्र समन्वयक व विस्ताराधिकारी या पदांवर पदोन्नतीसाठीही ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, या अटीमुळे अनेक सेवाजेष्ठ व अनुभवी शिक्षक पदोन्नतीपासून वंचित राहत असल्याने या अटीत शिथिलता आणावी, अशी मागणी आमदार



संजय केळकर यांनी केली आहे. सध्या शिक्षक पात्रता परीक्षेत सर्वसाधारण संवर्गातील शिक्षकांना उत्तीर्ण होण्यासाठी १५० पैकी ९० गुण मिळवणे अनिवार्य आहे. शिक्षकांचे वाढते वय, मानसिक ताण, बदललेला अभ्यासक्रम आणि दीर्घ सेवा कालावधी लक्षात घेता ही अट अव्यवहार्य ठरत असल्याचे आमदार केळकर यांनी नमूद केले. त्यामुळे १५० पैकी ९० गुणांऐवजी ६० गुणांची अट लागू करावी, अशी मागणी त्यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीमुळे अनेक सेवाजेष्ठ शिक्षकांना न्याय मिळेल, त्यांची पदोन्नतीचा मार्ग मोकळा होईल तसेच शिक्षण क्षेत्रातील अनुभवी मनुष्यबळाचा योग्य सन्मान होईल, असा विश्वास आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला आहे. शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शिक्षक वर्गातून व्यक्त होत आहे.

# हवेच्या प्रदूषणावर संसदेत आवाज

## डिमोलिशनसाठी परवाना प्रणाली लागू करण्याची डॉ. श्रीकांत शिंदेंची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २**

**ठाणे :** मुंबई, ठाण्यासारख्या दाट लोकवस्तीच्या महानगरांमध्ये गेल्या काही वर्षांत हवेच्या गुणवत्तेत मोठी घसरण होत असून याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. वाढती बांधकामे, रस्त्यांवर साचणारा राडारोडा आणि त्यातून हवेत मिसळणारी सूक्ष्म धूळ यामुळे दमा, श्वसनविकार, डोळ्यांची जळजळ यांसारख्या आजारांमध्ये वाढ होत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी संसदेत आवाज उठवण्यात आला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी संसदेत हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. इमारती पाडण्याच्या कामांवर तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या राडारोड्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस नियामक व्यवस्था लागू करावी, तसेच बांधकाम पाडकामासाठी स्वतंत्र परवाना प्रणाली लागू करण्याची मागणी त्यांनी केली डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले की, देशात बांधकामासाठी विविध नियम अस्तित्वात असले, तरी इमारत पाडण्याच्या (डिमोलिशन) कामांसाठी अद्याप कोणतीही ठोस आणि प्रभावी नियामक व्यवस्था नाही. याबाबत केंद्रीय स्थायी समितीच्या अहवालातही स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**उप विभागीय कृषि अधिकारी कल्याण, जिल्हा ठाणे,**
**ई-निविदा सुचना क्र. उविकृअक - ०३/२०२५-२६**

खालील वाक्यात नमुद केल्याप्रमाणे विविध कामे करण्यासाठी उप विभागीय कृषि अधिकारी कल्याण, जिल्हा ठाणे यांचेकडून बी-१ प्रपत्रात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहेत, सविस्तर माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०३.०२.२०२६ पासून पहावयास व डाऊनलोड करावयास मिळतील सर्व शुद्धिपत्रक दुरुस्त्या सुध्दा याच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येतील, कामाचे संक्षिप्त वर्णन खालाल प्रमाणे

**(रक्कम रुपये)**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम | बयाना रक्कम | निविदा शुल्क GST सह | नोंदणी वर्ग | निविदा डाऊनलोड सुरु करणे दिनांक | निविदा सादर करणेचाअंतिम दिनांक | निविदा उघडणे दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पात्र नोंदणीकृत कंत्राटदारासाठी** | | | | | | | | |
| १ | जुनी भात शेती दुरुस्ती, गाव देपोली, गट क्र. १ ते ६. ता. भिवंडी, जि. ठाणे | ५,३७,९८६ | ५३८० | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | ०३.०२.२०२६ स.११.०० वा | १७.०२.२०२६ स.११.०० वा | १८.०२.२०२६ स.११.०० वा |
| २ | जुनी भात शेती दुरुस्ती, गाव पहारे, गट क्र. १ ते ६, ता. भिवंडी जि. ठाणे | ५,३४,९३१ | ५३४९ | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | ०३.०२.२०२६ स.११.०० वा | १७.०२.२०२६ स.११.०० वा | १८.०२.२०२६ स.११.०० वा |
| ३ | जुनी भात शेती दुरुस्ती, गाव पोई, गट क्र १ ते २, ता. कल्याण, जि. ठाणे | ३,८७,०६९ | ३८७१ | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | ०३.०२.२०२६ स.११.०० वा | १७.०२.२०२६ स.११.०० वा | १८.०२.२०२६ स.११.०० वा |
| **ठाणे जिल्हयातील नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांचेसाठी** | | | | | | | | |
| ४ | जुनी भात शेती दुरुस्ती, गाव टेंभुर्ली, गट क्र. १ ते ४, ता. शहापुर जि. ठाणे (योजना - PMKSY २.०) | १४,९७,०४९ | १४९७० | ५९० | वर्ग १ अ ते ६ | ०३.०२.२०२६ स.११.०० वा | १७.०२.२०२६ स.११.०० वा | १८.०२.२०२६ स.११.०० वा |
| **ठाणे जिल्हयातील नोंदणीकृत मजुर कामगार सहकारी संस्था यांचेसाठी** | | | | | | | | |
| ५ | जुनी भात शेती दुरुस्ती, गाव वसत शेलवली, गट क्र १ ते १२, ता. कल्याण जि. ठाणे | १३,२१,२३३ | १३२१२ | ५९० | मकासस वर्ग अ व ब | ०३.०२.२०२६ स.११.०० वा | १७.०२.२०२६ स.११.०० वा | १८.०२.२०२६ स.११.०० वा |

टिप :- वरील कामाबाबत सविस्तर तपशिल व सादर करावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना निविदा संचात समाविष्ट आहे.
कोणतीही एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकरण्याचा अधिकार उप विभागीय कृषि अधिकारी कल्याण, जिल्हा ठाणे यांनी राखून ठेवला आहे.

**जावक क्रमांक : उविकृअ/निविदा क्र. ३/९७/२०२६**
**दिनांक : ०२.०२.२०२५**
**जावक क्रमांक : जिमाका/ठाणे/जाहि/2025-26/181**

**स्वाक्षरीत /-**
**उप विभागीय कृषि अधिकारी**
**कल्याण, जि.ठाणे**

# कागदपत्रे समजून घेतल्याशिवाय कोणतेही आर्थिक व्यवहार करू नका – ॲड. विनय कुमार सिंह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**ठाणे : प्रतिनिधी**

रिक्षा चालक बांधवांना वाहतूक दंड व दंडात्मक कारवाईत (फाईन व पेनल्टी) जास्तीत जास्त सवलत कशी मिळू शकते, पतपेढी किंवा इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज घेताना होणाऱ्या सामान्य चुका, जामीन (गारंटी) कधी द्यावा व कधी टाळावा, तसेच कायदेशीर कागदपत्रे पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत याबाबतची सविस्तर कायदेशीर माहिती जनजागृती बैठकीत रिक्षा टॅक्सी चालकांना मार्गदर्शन करताना ॲड. विनय कुमार सिंह यांनी दिली.

ठाणे शहरातील रिक्षा व टॅक्सी चालक बांधवांच्या हक्कांसाठी आणि हितासाठी शिव परिवारद्वारे संचालित शिव परिवार रिक्षा टॅक्सी कल्याण समिती यांच्या वतीने जनजागृती बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी रायलादेवी तलाव, वागळे इस्टेट, ठाणे येथे संस्थेचे संस्थापक ॲड. विनय कुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.



## शिव परिवारचा रिक्षा-टॅक्सी चालकांना दिलासा; हरित ठाणेसाठी सामूहिक संकल्प

यावेळी रिक्षा चालक बांधवांच्या वैयक्तिक व सामूहिक समस्या सोडवण्यासाठी सोमवार ते शनिवार सायंकाळी ८.३० ते ९.३० या वेळेत शिवशांती प्रतिष्ठानच्या मुख्य कार्यालयात प्रत्यक्ष भेट देण्याचे आवाहन करण्यात आले. येथे त्यांना योग्य कायदेशीर व सामाजिक सहकार्य दिले जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

बैठकीदरम्यान उपस्थित सर्व रिक्षा चालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, पोलीस प्रशासनास सहकार्य करणे तसेच "हरित ठाणे" उभारणीसाठी सक्रिय सहभाग घेण्याचा सामूहिक संकल्प केला. भविष्यात अशा प्रकारच्या जनजागृती बैठका नियमितपणे आयोजित करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना ॲड. विनय कुमार सिंह यांनी सांगितले की, आगामी काळात शिव परिवार युवा, विद्यार्थी, महिला व शिक्षकांसाठीही संघटनेचा विस्तार करणार असून, समाजातील प्रत्येक घटकाच्या समस्या सोडवण्यासाठी शिव परिवार भक्कमपणे उभा राहील. "आपण सर्वजण एकमेकांची ताकद बनू," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या यशस्वी कार्यक्रमासाठी शिवदूत कमलेश सिंह, अरविंद गिरी, दिलीप सिंह, धीरेंद्र सिंह, आशीष सिंह, मनोज सिंह, मुकेश यादव, अशोक गिरी, अनिल ताटरे, राजू गिरी यांच्यासह सर्व बांधवांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणावर चर्चा सुरू ! जितेंद्र आव्हाडांची प्रतिक्रिया

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २**

**ठाणे : अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलिनीकरणाबाबत चर्चा सुरू झाली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून या विषयावर चर्चा होत असली, तरी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांकडून विलिनीकरणाचा मुद्दा स्पष्टपणे फेटाळला जात आहे. त्यामुळे दोन्ही गटांच्या विलिनीकरणावर विविध नेत्यांकडून वेगवेगळी मते मांडली जात असून या चर्चेला वेग आला आहे.**



राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी विमान अपघातात निधन झाल्याने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनानंतर कार्यकर्त्यांकडून विविध ठिकाणी शोकसभांचे आयोजन करण्यात येत असून पक्षाच्या कार्यालयांमध्ये अस्थी दर्शनासाठी ठेवण्यात येत आहेत.

याच पार्श्वभूमीवर ठाणे येथील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या कार्यालयात अस्थी दर्शनासाठी व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी पक्ष विभाजनानंतर कट्टर विरोधक बनलेले राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड, राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक नजीब मुल्ला तसेच माजी खासदार आनंद परांजपे हे तिघे एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळाले. या भेटीत त्यांच्यात मनोमिलन झाल्याचेही दिसून आले.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दोन्ही राष्ट्रवादी पक्षांच्या विलिनीकरणाबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले असून, पुढील घडामोडींवर राज्याचे राजकारण अवलंबून राहणार असल्याचेही यावेळी स्पष्ट झाले.

# कल्याण पूर्वेत रस्ते अडवणाऱ्या फेरीवाल्यांवर पालिकेची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● दि. २

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील मलंगगड–नेवाळी रस्ता व नांदिवली तर्फ परिसरात रस्ते व पदपथ अडवून व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांमुळे सकाळपासून रात्री उशिरापर्यंत वाहतूक कोंडी होत होती. याबाबत वाढत्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पालिकेच्या 'आय' प्रभागाचे साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसांपूर्वी फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली असून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालक व प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. कल्याण पूर्व भागात चाळी व झोपडपट्टी भाग अधिक असल्याने फेरीवाले रस्ते, गल्लीबोळ व मुख्य वर्दळीचे रस्ते अडवून व्यवसाय करीत होते. त्यामुळे पादचाऱ्यांना चालणेही अवघड झाले होते. फेरीवाल्यांमुळे मलंगगड रस्त्याने नेवाळी, बदलापूर, अंबरनाथ तसेच काटई, तळोजा मार्गे जाणाऱ्या वाहनांना अडथळे येत होते. या पार्श्वभूमीवर साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप व अधीक्षक राजेंद्र साळुंखे यांनी परिसराची पाहणी केली असता वाहतूक कोंडीचे चित्र स्पष्ट झाले. त्यानंतर साहाय्यक आयुक्त जगताप, अधीक्षक साळुंखे व पथकप्रमुख विजय रसाळकर यांच्या नेतृत्वाखाली फेरीवाला हटाव पथकाने अचानक कारवाई करत रस्ते अडवून व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांचे साहित्य जप्त केले.

# कलियुगातील नातीगोती!



**आजच्या धावपळीच्या युगात नातेसंबंध टिकवणे हे मोठे आव्हान बनले आहे. बदललेली जीवनशैली, वाढती स्पर्धा, सोशल मीडियामुळे निर्माण होणारी तुलना आणि व्यक्तीगत अपेक्षा—या साऱ्यांचा परिणाम नात्यांवर होत आहे. कुटुंबातील नाती असोत किंवा मित्रमैत्रिणींची मैत्री, अनेकदा स्वार्थ आणि गैरसमज यामुळे दुरावा वाढतो. अशा काळात यशस्वी व्यक्ती नाती कशी जपते, याकडे पाहणे उपयुक्त ठरते.**

●●●●

**■ अपेक्षा कमी, कृतज्ञता अधिक**

नात्यांमध्ये ताण येण्यामागे अपेक्षा हे प्रमुख कारण आहे. समोरची व्यक्ती आपल्यासारखीच विचार करेल, आपल्यासाठी तशीच उभी राहील, अशी अपेक्षा ठेवल्यास निराशा होऊ शकते. यशस्वी व्यक्ती अपेक्षा मर्यादित ठेवते आणि जेवढे मिळते त्याबद्दल कृतज्ञ राहते. छोट्या मदतीचेही आभार मानण्याची वृत्ती नात्यांना बळकटी देते.

**■ सीमारेषा ठरवणे गरजेचे**

प्रत्येक नात्यात 'सीमारेषा' असणे आवश्यक आहे. वेळ, पैसा आणि भावनिक ऊर्जा—या तिन्ही बाबतीत स्पष्टता ठेवली तर गैरसमज टळतात. सतत 'हो' म्हणत राहिल्यास स्वतःवर ताण येतो. गरजेच्या वेळी नम्रपणे 'नाही' म्हणण्याचे धैर्य ठेवणे हे आत्मसन्मानाचे लक्षण आहे. नातं टिकवण्यासाठी स्वतःचा त्याग सतत करणे योग्य नाही.

**■ संवाद स्पष्ट आणि शांत ठेवा**

अनेक नाती गैरसमजामुळे तुटतात. मनातल्या भावना दाबून ठेवण्याऐवजी त्या योग्य शब्दांत, शांतपणे मांडल्या तर प्रश्न सुटू शकतात. आरोप-प्रत्यारोप टाळून स्वतःच्या भावनांबद्दल बोलणे अधिक परिणामकारक ठरते. रागाच्या भरात उच्चारलेले शब्द नात्यांवर कायमची ओरखडे उमटवू शकतात.

**■ मदत करा, पण शोषण होऊ देऊ नका,**

यशस्वी व्यक्ती मदतीला सदैव तयार असते; मात्र वारंवार गैरफायदा घेतला जात असल्यास ती थांबते. गरज आणि सवय यामधील फरक ओळखणे महत्त्वाचे आहे. मदत ही नात्याची गोडी वाढवते, पण शोषण नात्याची कटूता वाढवते.

**■ तुलना आणि मत्सर टाळा**

तुलना ही नात्यांची शांतता हिरावून घेते. दुसऱ्यांच्या यशाबद्दल मनापासून आनंद व्यक्त केला तर नात्यात सकारात्मकता वाढते. स्वतःचे यश मिरवण्यापेक्षा साधेपणा ठेवणे आणि समोरच्याच्या प्रयत्नांचे कौतुक करणे नात्यांना टिकवते.

**■ नकारात्मक नात्यांपासून आरोग्यदायी अंतर**

सतत नकारात्मकता, टीका किंवा अपमान करणारी नाती मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करतात. अशा वेळी अंतर ठेवणे म्हणजे द्वेष नाही, तर स्वतःच्या सन्मानाची जपणूक आहे. काही नाती सोडून देणेही आयुष्यात पुढे जाण्यासाठी आवश्यक ठरते.

आजच्या काळात नातेसंबंध टिकवण्यासाठी केवळ भावनाच नाही, तर समजूतदारपणाही गरजेचा आहे. कमी अपेक्षा, स्पष्ट संवाद, योग्य सीमारेषा आणि आत्मसन्मान या चार मूल्यांवर उभी असलेली नाती अधिक टिकाऊ ठरतात. यश म्हणजे केवळ वैयक्तिक प्रगती नव्हे; सोबत माणसांशी असलेली नाती जपण्याची कला शिकणे हेदेखील खरे यश आहे.



**● संदिपान सोनवणे**
**सहाय्यक पोलीस निरीक्षक, ठाणे ग्रामीण**



# कल्याण : मुलाची हत्या करणाऱ्या वडिलांना जन्मठेप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**कल्याण** - पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने रागाच्या भरात बारा वर्षापूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास आपली पत्नी आणि झोपेत असलेल्या चार मुलांवर धारदार पात्याने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले होते. कल्याण पश्चिमेतील रामबाग गल्ली क्रमांक चारमध्ये स्वानंद कॉलनीत हे कुटुंब राहते. या हल्ल्यात नऊ वर्षाचा प्रणव उर्फ देवेश सुनील पाताडे (९) या मुलाचा जागीच मृत्यू झाला होता. पत्नी मीना, इतर तीन मुले सुजित, शुभम (५), सर्वेश (अडिच वर्ष) गंभीर जखमी झाले होते. याप्रकरणात कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधिश एस. एस. इनामदार यांनी मारेकरी वडील सुनील सदाशिव पाताडे (४६) याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

सुनील सदाशिव पाताडे (४६) असे जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला पाच हजार रूपये दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास तीन महिने कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. मार्च २०१३ मध्ये ही खुनाची घटना घडली होती. साडे बारा वर्षानंतर या गुन्ह्याचा निकाल लागला आहे. याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात गंभीर जखमी पत्नीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल होता. महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीरामसिंग परदेशी, पोलीस निरीक्षक विजय नाईक, सोपान नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एस. के. धनवडे यांनी तपास करून कल्याण जिल्हा न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते.

# ठाणे -पालघर जिल्हा महाराष्ट्रीय वैश्य समाजाचा पहाणी दौरा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद** - वैश्य समाज संघटनेच्या वतीने वैश्य समाज बांधवांसाठी अनेक उपक्रम राबवले जातात. या मध्ये वधुवर परिचय वेळावा, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर, महिला व लहान मुलांसाठी सास्क्रूतीक कार्यक्रम, संस्कार शिबीर, महिला सहल अने अनेक उपक्रम राबवले जातात. याचा एक भाग म्हणून गेली ५० वर्ष महिला सहल हा उपक्रम राबवला जातो. समाजातील अनेक महिला चूल आणि मुल या मध्ये व्येस्त असतात. तर काही महिलांची अर्थिक बाजू कमकुवत अहल्याने सहलिच्या निमित्ताने फिरू शकत नाही. ही बाब वैश्य समाज संघाने लक्षात घेऊन संस्थेच्या



माध्यमातून सहलिजे आयोजन केले जाते. या मध्ये महिलांचा आर्थिक सभाग असतो. सहलिच्या वेळी येणारी अर्थिक तुट वैश्य समाज संघटना अर्थिक मदत करून भरून काढते. या वर्षीही दापोली येथे महिला सहल निच्चित कल्याने या सहलिच्या नियोजनात अडचण येऊ नये म्हणून अध्यक्ष निलेश गंधे यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वय समिती प्रमुख दिलीप भोपतराव, उपाध्यक्ष प्रियेश (दादा) जगे, स्रिप्रतिनिधी सौ.पुजा काबाडी, उपस्रिपतीनिधी सौ. मयूरी तोंडलीकर सल्लागार नंदकिशोर मलबारी, सभापती महेश (बंटी)सिंगासणे पंकज जगे यांनी पहाणी दौरी केला. महिलांना समुद्राचा आनंद घेता यावा म्हणून बिचच्या लगत असलेल्या रिसॉर्ट व भोजनाची व्यवथा केली आहे. या मध्ये कोंबडी वडे मच्छीचाही स्वाद महिलांना घेता येणार आहे. स्विमिंग चाही आनंद घेता येणार असल्याची माहीती अध्यक्ष गंध्ये यांनी दिली.



# वाड्यातील परळी आश्रमशाळेत ध्यान शिबिराचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा :** लोकमाध्यम चॅरिटेबल ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. प्रवीण काजरोळकर व विश्वस्त श्रीमती लता परब यांच्या पुढाकाराने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, परळी, वाडा, जिल्हा–पालघर येथे विद्यार्थ्यांसाठी दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी रोजी तीन दिवसीय ध्यान (मेडिटेशन) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सर्च विदिन फाउंडेशनचे संस्थापक - अध्यक्ष श्री. अमोल काजरोळकर यांनी विद्यार्थ्यांना ध्यानाच्या माध्यमातून एकाग्रता वाढवणे, स्मरणशक्ती सुधारणा व ताण-तणाव नियंत्रण याबाबत मार्गदर्शन केले. शिबिराचे आयोजन केल्याबाबत आश्रमशाळेचे मुख्याध्यापक श्री. विलास बंजारा यांनी सर्च विदिन फाउंडेशनचे आभार मानले. शिबीर यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकवर्ग व कर्मचारी ह्यांनी विशेष मेहनत घेतली.

# जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, दि. 2 :** राज्यातील 12 जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत 125 पंचायत समित्यांमध्ये शनिवार दिनांक 7 फेब्रुवारी 2026 रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.

यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर, ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत. अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये रायगड (पंचायत समित्या - पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड. रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर); रत्नागिरी (मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर); सिंधुदुर्ग (वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग); पुणे (जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर); सातारा (खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड); सांगली (आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज); सोलापूर (करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट); कोल्हापूर (शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड); छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण); परभणी (जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड); धाराशीव (परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा, उमरगा) आणि लातूर (पंचायत समित्या - अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा) यांचा समावेश आहे.

# अस्मिता रोल बॉल लीग स्पर्धा संपन्न




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** अस्मिता रोल बॉल लीग 2025 26 या स्पर्धा कल्याण येथील ब्रायटन स्कूल येथे अतिशय चांगल्या प्रकारे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्हा तसेच ठाणे जिल्ह्यातील एकूण 16 संघांनी सहभाग घेतला होता. या प्रसंगी या स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. शर्मिला पांडे, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, माजी नगरसेवक सुनील वायले तसेच नवनिर्वाचित नगरसेविका प्रमिला पाटील, शालिनी वायले, डॉ. तनुजा वायले, किरण भांगले विविध मान्यवरांनी या स्पर्धेला आपली उपस्थिति दर्शविली. या प्रसंगी हॉली क्रॉस शाळेच्या मुख्याध्यापिका जॅसिंथा सुआरेस, उपमुख्याध्यापिका प्रिसिला लोबो तसेच तसेच भारतीय रोल बॉल संघटनेचे सचिव प्रताप पगार यांनी सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच या स्पर्धा यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी अपर्णा सेतूरमण, ऐश्वर्या मदणे गाडे, शोभा कावरे, संजय मुसळे, रवींद्र देसाई आणि राहुल पाटील, प्रसाद ढवळे यांनी मार्गदर्शन केले.



# बी. के. बिर्ला महाविद्यालयात नव साहित्यिकांचा सन्मान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** बी. के. बिर्ला महाविद्यालय आणि अखिल भारतीय साहित्य परिषदेतर्फे पुरस्कृत साहित्य भारती प्रांत यांनी कोंकण प्रांतातील नवलेखक व साहित्य अभ्यासक यांच्या सन्मानार्थ आयोजित समारंभ यशस्वीपणे पार पडला. या सन्मानासाठी कोंकण प्रांतातील शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांसाठी त्रिस्तरीय — त्रिभाषिक नवलेखक शोध निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी १२७ शैक्षणिक संस्थांकडून हिंदी, इंग्रजी आणि मराठीत एकूण १५८७ निबंध प्राप्त झाले. पात्र परीक्षकांच्या मूल्यमापनानंतर एकूण ६९ विद्यार्थ्यांची पारितोषिकांसाठी निवड करण्यात . विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक रक्कम व सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.

सन्मान समारंभाचे मुख्य पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक इंदुशेखर तत्पुरुष (जयपूर) उपस्थित होते. त्यांनी स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेल्या 'पर्यावरण संरक्षणात आपली भूमिका', 'वर्ष २०४७पर्यंत भारत कसा विकसित होईल' आणि 'स्वदेशी स्वीकारा: आत्मनिर्भर भारत घडवा' या तीन विषयांबाबत आपले विचार मांडले. अखिल भारतीय साहित्य परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. दिनेशप्रताप सिंह यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. शिक्षण संचालक डॉ. नरेश चंद्र यांनी नवसाहित्यिकांसाठी आशा कार्यक्रमांचीअत्यंत आवश्यकताअसल्याचे सांगत यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

मुख्य अतिथी म्हणून उपस्थित महाराष्ट्र राज्य गृह रक्षक दलाचे सहायक संचालक विजयकुमार कलवले यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करताना नेहमी प्रश्न उपस्थित ठेवण्याचे आणि 'स्क्रोल'च्या बदल्यात 'स्कॉलर' बनण्याचे महत्व सांगितले. प्रमुख उपस्थित डॉ. बलिराम गायकवाड यांनी मानवी जीवनातील साहित्याच्या उपयुक्ततेवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना साहित्याशी जोडण्याचे आवाहन केले. सन्मानित अतिथी दुर्गेश सोनार यांनी या सन्मान समारंभात उपस्थित विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत साहित्यातील नैतिकता आणि राष्ट्राबद्दलचे योगदान यावर भर दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक डॉ. श्यामसुंदर पांडे यांनी केले.

# टिटवाळा : सांडपाण्याचा नाला ठप्प
## दुर्गंधी-डासांचा सुळसुळाट, नागरी आरोग्य प्रश्न ऐरणीवर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या 'अ' प्रभागातील मांडा–टिटवाळा परिसरात सांडपाणी वाहून नेणारा प्रमुख नाला पूर्णतः तुंबल्याने नागरिकांचे दैनंदिन जगणे त्रस्त झाले आहे. रेल्वे स्थानकाजवळील सुमुख सोसायटी परिसरातून जाणाऱ्या या नाल्यात प्लास्टिक बाटल्या, कचरा व गाळ यांचा प्रचंड साठा साचल्याने पाणी अनेक ठिकाणी अडून राहिले आहे. परिणामी परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांची पैदास वाढत चालल्याने आरोग्यविषयक गंभीर धोका निर्माण झाला आहे.



साचलेल्या पाण्यामुळे संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता वाढली असून मांडा (पूर्व) भागातील सांडपाणी नैसर्गिक प्रवाहाने पुढे जाण्यात अडथळा निर्माण झाला आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही स्थिती अधिकच धोकादायक ठरू शकते, अशी ठाम चिंता स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. वेळेत उपाय न झाल्यास पाणी तुंबून परिसरात पूरसदृश स्थिती निर्माण होण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत सामाजिक कार्यकर्ते व कायदेविषयक सल्लागार ॲड. जितेंद्र जोशी यांनी प्रशासनाकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली आहे. नाल्याची त्वरित साफसफाई, साचलेला कचरा उचलणे आणि नियमित देखभाल यांची अंमलबजावणी तात्काळ व्हावी, अशी त्यांनी जोरदार मागणी केली. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर असल्याने संबंधित यंत्रणांनी विलंब न करता कारवाई करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबत घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक आरोग्य विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या भागातील आरोग्य निरीक्षक कराळे यांच्याशी संपर्क साधला असता, अद्याप अधिकृत तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र तक्रार असो वा नसो, प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली जाईल आणि समस्या आढळल्यास योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

# पासिंग सुविधा नसल्याने भिवंडीत रिक्षाचालक त्रस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (शरद भसाळे) :** ठाणे जिल्ह्यात भिवंडी मोठा तालुका असून या तालुक्याच्या सीमेलगत पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील इतर तालुके आहेत. या सर्व ठिकाणी विकास होत असताना प्रवासी वाहतुकीची साधने कमी असल्याने अनेक प्रवाश्यांना रिक्षांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे भिवंडी शहर आणि तालुक्यात मिळून रिक्षाची मोठी संख्या आहे. या रिक्षाच्या पासिंगसाठी आणि मीटर पासिंगसाठी दैनंदिन रोजगार सोडून वाहतूक कोंडीचा सामना करीत ३० किलोमीटर आडवळणाच्या ठिकाणी जावे लागत आहे. त्यामुळे रिक्षासह सर्व प्रकारच्या वाहनांसाठी शासनाने हि सुविधा भिवंडीत सुरु करावी,अशी मागणी रिक्षा चालक संघटना कडून राज्य शासनाकडे केली जात आहे.



भिवंडी शहर व ग्रामीण भागातून समृद्धीसह अनेक मार्गाचे काम केंद्र व राज्यशासनाच्या माध्यमातून सुरु आहे.अशा वेळी ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी रस्त्यालगत अथवा एखाद्या धाब्याच्या शेजारी आपले बस्तान मांडून वाहनांवर नियंत्रण करताना दिसतात.अशा वेळी महामार्ग,राज्यमार्ग आणि शहरातील छोट्या-मोठ्या मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्याधुनिक सुविधांचे कार्यालय बनविणे ही काळाची गरज आहे. अशा कार्यालयाद्वारे भिवंडी तालुक्यासह जिल्ह्यातील इतर वाहनांसाठी येथे पासिंगची सोय केल्यास ठाणे,ऐरोली आणि विटावा येथे जाण्याचा त्रास कमी होऊन ठाण्यात जाणारी वाहने काहीअंशी कमी करता येणे शक्य असे मत रिक्षा चालक वर्गाकडून व्यक्त केले जात आहे. भिवंडी हे कामगारांचे शहर म्हणून ओळखले जाते. शहरात सिटी बस नसल्याने येथील प्रत्येकास रिक्षावर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे रिक्षांची संख्या मोठी आहे. बऱ्याच काळापासून येथील ऑटो-रिक्षा चालक आणि मालकांना रिक्षा पासिंग आणि मीटर पासिंग साठी वहातुक कोंडीचा सामना करीत ३० किलोमीटरचा प्रवास करणे एक गंभीर बनली असून त्यासाठी त्यांना दुर्गम भागात भटकंती करावी लागते. त्या मुळे केवळ वेळ आणि पैसा वाया जात नाही तर शारीरिक आणि मानसिक आघात देखील सहन करावे लागत आहेत. अनेक रिक्षाचालकांची कुटुंब दैनंदिन उत्पन्नावर अवलंबून असल्याने त्यांचा रोजगार बुडाल्याने आर्थिक भर पडतो तर पासिंग नाही केली तर पोलिसांचा दंड भरावा लागती. असा दुहेरी फटका त्यांना सहन करावा लागत आहे. भिवंडी आणि तालुक्यातील सर्व रिक्षा चालकांना रिक्षा व मीटर पासिंगसाठी ठाणे,विटावा आणि ऐरोली येथे जावे लागते.ऐरोली मधील पासिंगची जागा ही आडबाजूला आहे.आरटीओ अधिकाऱ्यांच्या आगमन आणि प्रस्थान वेळा निश्चित नसल्यामुळे रिक्षा मालकांना सकाळी ७ वाजता भिवंडीतून निघावे लागते आणि संपूर्ण दिवस वाट पाहत घालवावा लागतो. विशेषतः महिला परमिट धारकांना या गैरसोयीचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेला आणि आरोग्याला धोका निर्माण होतो.

**सध्या शहरातील बरीच सरकारी जमीन रिकामी आहे. त्यावर प्रशासनाचे लक्ष नसल्याने अतिक्रमणे होत आहे. अशा शासनाच्या मोकळ्या जागेवर प्रादेशिक परिवहन कार्यालय बांधण्यासाठी शहरातील रिक्षा असोसिएशनने शासनाकडे अर्ज केले आहेत. मात्र अर्जावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.समस्या सोडवण्याबाबतीत सरकारी यंत्रणेच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे मत व्यक्त केले जात आहे.या समस्येचा परिणाम केवळ स्थानिक अर्थव्यवस्थेवरच होत नाही तर शहराच्या वाहतूक व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर होतो. भिवंडीसारख्या औद्योगिक केंद्रात, जिथे लाखो कामगार दररोज रिक्षाने प्रवास करतात.त्यासाठी रिक्षासारख्या परवडणाऱ्या आणि सुलभ वाहतूक सेवांचे सुरळीत संचालन आवश्यक आहे.**

मुंबई उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण आदेशानुसार आरटीओला त्यांच्या स्वतःच्या जागेवर काम सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले होते.असे असूनही, भिवंडीमध्ये आरटीओची स्वतंत्र कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील रिकाम्या सरकारी जमिनीवर आरटीओने पासिंग सेंटर स्थापन करावे अशी मागणी करत आहे रिक्षा संघटनेच्या माध्यमातून होत आहे.






# कोपरीत राबविण्यात आलेल्या सर्वंकष स्वच्छता मोहिमेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (02) :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेली सर्वंकष स्वच्छता मोहिम नियोजित महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या नेतृत्वाखाली आज नौपाडा कोपरी प्रभागसमिती अंतर्गत येत असलेल्या कोपरी परिसरात व्यापक प्रमाणात राबविण्यात आली. सकाळी 7.30 वा.अष्टविनायक चौकातून स्वच्छतेची शपथ घेवून या मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. "कर्तव्य आज, मग पदाचा चार्ज" असे नमूद करीत उपमुख्यमंत्र्यांनी सुरू केलेली ही मोहिम संपूर्ण ठाणे शहरात अधिक व्यापक प्रमाणात राबविणार असून या मोहिमेत ठाणेकरांचेही सहकार्य आवश्यक असल्याचे नियोजित महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. या सर्वंकष स्वच्छता मोहिमेस नगरसेवक मालती पाटील, नम्रता पमनानी, भरत चव्हाण, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (1) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, उपायुक्त मधुकर बोडके, दीपक झिंजाड, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपनगरअभियंता विकास ढोले, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, मुख्य स्वच्छता निरीक्षक शंभूराज कांबळे, मयुरी वखारिया, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पुरी, चारू घुट्टे आदी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. अष्टविनायक चौकातून या मोहिमेस प्रारंभ झाला, त्यानंतर कोपरी गाव, कन्हैया नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच बारा बंगला या भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.


Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024